MHAU060024972025

फौजदारी किरकोळ अर्ज/307/2025 कन्नड ग्रामीण

**रुखसारबी अनिसखा वि.. अनिसखा अलीखा**

**निशाणी १ खालील आदेश**

प्रस्तुत प्रकरणामध्ये गैरअर्जदार याने पोटगीची थकीत रक्कम भरली नाही म्हणुन वारंट काढण्यात आले होते. आजरोजी सार्वजनिक सुटटीच्या दिवशी गैरअर्जदार याला पोलीसांनी वारंटमध्ये आणलेले आहे. त्यामुळे सीआएस प्रणालीवरील प्रकरण तांत्रिक कारणांमुळे पाहता आले नाही. त्यामुळे ई कोर्ट वरील पुर्वीचे आदेश व अर्जदार हिने तिच्याकडील सादर केलेल्या प्रकरणातील कागदपत्रांवरुन प्रस्तुतचा आदेश करण्यात आलेला आहे. अर्जदार स्वतः हजर असुन गैरअर्जदार, त्याचे वडल व त्याचे विधीज्ञ हजर आहेत. मी दोन्ही बाजुंना ऐकले.

०२. गैरअर्जदार याने अर्जदार हिला वेळोवेळी पोटगी न दिल्यामुळे त्याला यापुर्वी कारावासाची शिक्षा करण्यात आली होती. त्याप्रमाणे कारावासात गेल्यानंतर काही दिवसांनी अंशतः रक्कम भरल्यामुळे त्याला मुक्त करण्यात आले. त्यानंतर वेळोवेळी नेमलेल्या तारखांना तो स्वतः हजर न राहता त्याच्या वडीलांना हजर ठेवतो. त्याच्यामार्फत थकीत पोटगी भरण्याचा प्रयत्न केला जात नाही. दोन्ही पक्षकारांमधील वाद हा सुमारे १० वर्षाहुन अधिक कालावधीचा आहे. गैरअर्जदार याने अर्जदार हिला पोटगी देण्यासाठी खुप टाळाटाळ केलेली आहे. त्याला वारंट काढल्याशिवाय किंवा

कारावासात पाठविल्याशिवाय त्याने भरीव रक्कम भरलेली नाही. यावरुन गैरअर्जदार हा न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करुन अर्जदार हिला पोटगीचीा रक्कम देत नाही असे स्पष्ट होते. आजपर्यंत गैरअर्जदार याने अर्जदार हिला सुमारे ९० हजार रुपये दिलेले आहेत. न्यायालयाने दरमहा ५ हजार अशी पोटगीची रक्कम मंजुर केलेली आहे. आतापर्यंतची जमा रक्कम वजा करुन कारावासाची शिक्षा सुनावणे गरजेचे आहे. पुर्वी ५ महिन्यांची कालावधीची शिक्षा करुन देखील गैरअर्जदार याने संपुर्ण थकीत रक्कम भरलेली नव्हती. त्यामुळे आता जास्त कालावधीकरीता शिक्षा केल्याशिवाय पर्याय दिसुन येत नाही. गैरअर्जदार याला प्रकरणाचे गांभीर्य नाही. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. गैरअर्जदार याला दिनांक ०६.११.२०२१ पासुन दिनांक ०६.११.२०२२ च्या कालावधीसाठी पोटगीची रक्कम थकीत ठेवल्याने सदर १२ महिन्याच्या कालावधीकरीता १२ महिन्यांची कारावासाची शिक्षाा सुनावण्यात येते.

२. त्याने उपरोक्त कालावधीची थकीत रक्कम भरल्यास त्याला मुक्त करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.03.11 13:09:21 +0530

(श्री वि.द. पाटील)

दिनांकः११.०३.२०२६

दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथमवर्ग न्या. कन्नड
कन्नड,औरंगाबाद

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Vishnu D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C. Kannad |
| Date | 11.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer | 11.03.2026 |
| Order uploaded on | 11.03.2026 |